# य[illegible]स्वी विद्यार्थ्यांचा चॅप्टरतर्फे सत्कार

## आयसीडब्ल्यूए : विद्यार्थ्यांना दिली अभ्यासक्रमाची माहिती

**औरंगाबाद, ता. १२ :** 'आयसीडब्ल्यूए'च्या जून २००८ मध्ये झालेल्या परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार औरंगाबाद चॅप्टर ऑफ कॉस्ट अकौंटंट्स या संस्थेतर्फे नुकताच करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार श्रीकांत जोशी, 'आयसीडब्ल्यूए'चे केंद्रीय समिती सदस्य संजय भार्गवे, पश्चिम विभाग अध्यक्ष ए. बी. नवाल, मनुभाई देसाई, अमित आपटे, पी. जी. वांद्रेकर, श्री. पालीवाल, के. पी. उन्नीकृष्णन, अरुणा सोमण आदी उपस्थित होते.

या प्रसंगी श्री. जोशी यांनी, जागतिक पातळीवर ठसा उमटविण्यासाठी कॉस्ट अ[illegible]चा हा अभ्यासक्रम अतिशय उपयुक्त असल्याचे मत व्यक्त केले. श्री. भार्गवे यांनी अभ्यासक्रमाविषयी माहिती दिली. श्री. नवाल यांनी औरंगाबाद विभागाचा निकाल सातत्याने उंचावत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांना ए. आर. जोशी, रामानंद मोदानी, संजय मुंदाडे, भरत आसावा, आशीष देवढे, मनोज मालपाणी, अनुप अस्थाना यांनी पारितोषिके जाहीर केली. पाहुण्यांचा परिचय आणि स्वागत अनुक्रमे एस. पी. भंगाळे, एम. आर पंडित, राजेश शुक्ला यांनी केले. चॅप्टरतर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचे तसेच व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळा आयोजनासंबंधी चॅप्टरचे अध्यक्ष एस. पी. भंगाळे यांनी माहिती दिली. प्रशिक्षण समितीचे अध्यक्ष ए. आर. जोशी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. राजेश शुक्ला यांनी सूत्रसंचालन केले. आर. डी. खंडाळकर यांनी आभार मानले. कार्यक्रमाला पी. पी. मोहनी, एस. बी. खडके, पी. के. खेमका, बिश्वेश्वर सेन, आर. पी. गोरे, एम. एम. पटेल, राजेश देशमुख, एच. बी. शहा, आदिती मंडलिक आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वितेसाठी शिरीष जोशी, रविकिरण पाटील, प्रमोद पोहनेरकर आदींनी प्रयत्न केले.

## अंबानी फाउंडेशनची प्रांजलीला शिष्यवृत्ती



प्रांजली देशमुख

**औरंगाबाद, ता. १२ :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परीक्षेतील गुणवंतांना धीरूभाई अंबानी फाउंडेशनतर्फे दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्तीसाठी लातूर येथील प्रांजली नारायण देशमुख हिची निवड झाली आहे. ९३.९४ टक्के गुण मिळवून लातूर विभागातील गुणवत्ताप्राप्त प्रांजलीने राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षेतही यश संपादन केले आहे.

## पैठणला ५० मि.मी. पाऊस

**पैठण, ता. १२ (बातमीदार) :** पैठण शहर, परिसराला शुक्रवारी (ता. १२) मुसळधार पावसाने झोडपून काढले. दिवसभर हा पाऊस सुरू होता. य[...] पावसामुळे जनजीवन विस्कळित झाले.

सकाळी दहाला पावसाला सुरवात झाली. अधूनमधून पावसाच्या सरी कोसळल्या. दुपारी दोनच्या सुमारास सुरू झालेला मुसळधार पाऊस रात्री उशिरापर्यंत सुरूच होता. पावसामुळे शहरातील सर्व रस्त्यांवरून पाण्याचे लोंढे वाहिले. बाजारपेठेत शुकशुकाट होता. गणेशोत्सव मंडळांच्या कार्यकर्त्यांची यामुळे धांदल उडाली. मंडळाने केलेल्या विविध देखाव्यांचे नुकसान झाले. शुक्रवारी (ता. १२) ५० मि. मी. पाऊस झाला. ही माहिती तहसीलदार केशव नेटके यांनी दिली. तालुक्यातील विहामांडवा, पाचोड, नांदर, दावरवाडी, खेर्डा, बालानगर, आडूळ, ढोरकीन, बिडकीन, पिंपळवाडी, जायकवाडी, गोदाकाठच्या पैठण हद्दीत येणाऱ्या १५ गावांत पाऊस झाला.



**औरंगाबाद :** 'आयसीडब्ल्यूए'च्या परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा चॅप्टरतर्फे नुकताच सत्कार करण्यात आला. या वेळी उपस्थित श्रीमती अरुणा सोमण, ए. आर. जोशी, एम. के. देसाई, ए. बी. नवाल, श्रीकांत जोशी, एस. आर. भार्गवे, शीतल तोतला यांच्यासह राजेश शुक्ला, एस. आर. पिंपळे, एस. पी. भंगाळे, अभिषेक देशपांडे, किशोर राखे, सुनील मणियार, सुरेखा कुलकर्णी, मनीषा लुल्ला, प्राजक्ता शिंदे, पूनम महर्षी.

# आयसीडब्ल्यूए झालेला एकही विद्यार्थी बेकार राहत नाही -भार्गवे

**औरंगाबाद, दि.१५ (लोकमत ब्युरो)**- आयसीडब्ल्यूए झालेला एकही विद्यार्थी बेकार राहत नाही, असा दावा आयसीडब्ल्यूएच्या केंद्रीय समितीचे सदस्य संजय भार्गवे यांनी एका पत्रपरिषदेत केला.

त्यांनी सांगितले की, आयसीडब्ल्यूएचे सदस्य ४५ हजार असून, १ लाख ७५ हजार विद्यार्थी आहेत. कालकता येथे मुख्य कार्यालय असून, देशभर ९६ शाखा आहेत. १ जानेवारी २००८ पासून आयसीडब्ल्यूएचा अभ्यासक्रम बदलला असून, कॅनडानेही या अभ्यासक्रमाची योग्य दखल घेऊन हा अभ्यासक्रम सर्वोत्कृष्ट असल्याचे कळविले आहे. आयसीडब्ल्यूए शिकत असतानाच आता नोकरीच्या संधी उपलब्ध होत आहेत, हे विशेष होय. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावरही नोकरीच्या संधी उपलब्ध होत आहेत. मॅनेजमेंट कन्सल्टन्सी व आयटीमध्येही नोकरीच्या संधी असून, विद्यार्थ्यांचा परदेशात जाण्याचा कलही वाढत आहे.

सरकारच्या आदेशानुसार अल्प उत्पन्न गटातील ग्रामीण विद्यार्थ्यांसाठीही कमी फीमध्ये शिकण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली. आयसीडब्ल्यूएचे हे सुवर्णमहोत्सवी वर्ष असून, यानिमित्त पुणे येथे २२ ते २४ जानेवारी २००९ दरम्यान राष्ट्रीय अधिवेशन आयोजित करण्यात येणार असल्याचे भार्गवे यांनी सांगितले. या पत्रपरिषदेस औरंगाबाद शाखेचे अध्यक्ष सुरेश बंगाळे, अमित आपटे, संदीप वांदेकर, अरुणा सोमण, जी.आर. पालीवाल, मनूभाई देसाई, प्रवीण मोहंती, आर.डी. खंडाळकर, ए.आर. जोशी आदींची उपस्थिती होती.

# कॉस्ट अकौंटंटना देश-परदेशात संधी

## संजय भार्गवे : पुणे-मुंबईत कॅंपस इंटरव्ह्यू

**औरंगाबाद, ता. ९ :** आयटी कंपन्या, टॅक्सेशन फर्म अनेक क्षेत्रांमध्ये कॉस्ट अकौंटंटना बहुराष्ट्रीय कंपन्यांत मोठ्या हुद्द्यांवर, भरघोस वेतनाच्या नोकऱ्या मिळत आहे, अशी माहिती दी इन्स्टिटयूट ऑफ कॉस्ट अँड वर्क्स अकौंटंट्स ऑफ इंडियाचे केंद्रीय समिती सदस्य संजय भार्गवे यांनी मंगळवारी (ता. नऊ) एका पत्रकार परिषदेत दिली.

आयसीडब्ल्यूएच्या परीक्षेमध्ये पश्चिम विभागात औरंगाबाद शाखेतून सर्वाधिक विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यांचा सत्कार तसेच केंद्रीय समिती सदस्यांच्या बैठकीनिमित्ताने ही पत्रकार परिषद होती. याला वेस्टर्न इंडिया रिजनल कौन्सिलचे अध्यक्ष अशोक नवाल उपस्थित होते. श्री. भार्गवे यांनी संस्थेबाबत माहिती दिली. आयसीडब्ल्यूएचा अभ्यासक्रम हा आंतरराष्ट्रीय दर्जाचा असून, त्याच्याशी सुसंगत असल्याचे ते म्हणाले. हा अभ्यासक्रम केवळ ३५ हजार रुपयांत पूर्ण होतो. विद्यार्थ्यांना तीन वर्षांचे प्रात्यक्षिक अनिवार्य केले आहे. त्यात विद्यार्थ्यांकडून सर्व प्रात्यक्षिके करवून घेतली जातात. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांकरिता एक वर्षाचा सर्टिफिकेट इन अकौंटिंग टेक्निशियन हा अभ्यासक्रम सुरू केला आहे. त्याद्वारे रोजगाराच्या मोठ्या संधी प्राप्त होत आहेत. हा अभ्यासक्रम चार्टर्ड अकौंटंट अभ्यासक्रमाचा समकक्ष असल्याची माहितीही त्यांनी दिली. या प्रसंगी अमित आपटे यांनी, मुंबई येथे २७ सप्टेंबरला आणि पुणे येथे चार ऑक्टोबरला आयसीडब्ल्यूए विद्यार्थ्यांसाठी कॅंपस इंटरव्ह्यूचे आयोजन करण्यात आल्याची माहिती दिली. मोठमोठ्या कंपन्या यात सहभाग घेणार आहेत. गतवर्षी या उपक्रमांतून विद्यार्थ्यांना सरासरी साडेतीन लाख रुपयांचे पॅकेज मिळाल्याचे त्यांनी सांगितले. अध्यक्ष नवाल यांनी सांगितले, की संस्थेला ५० वर्षे पूर्ण होत असून, त्या निमित्ताने २२ ते २४ जानेवारीदरम्यान पुणे येथे राष्ट्रीय अधिवेशन होणार आहे. अनेक आंतरराष्ट्रीय प्रतिनिधीही यात सहभागी होणार आहेत. औरंगाबाद शाखेचे अध्यक्ष सुरेश बंगाळे, अमित आपटे (पुणे), मनुभाई देसाई (सूरत), अरुणा सोमण (मुंबई), माजी अध्यक्ष संदीप वांदेकर, जी. आर. पालीवाल, प्रवीण मोहंती, सचिव आर. डी. खंडाळकर, ए. आर. जोशी, पंडित उपस्थित होते.